-II

28/08/2021

सूची क्र.2

दुय्यम निबंधक : सह दु.नि. नाशिक 4
दस्त क्रमांक : 8044/2021
नोंदणी :
Regn:63m

गावाचे नाव : सातपूर

| | |
|---|---|
| (1)विलेखाचा प्रकार | फरोक्तखरेदीखत |
| (2)मोबदला | 40000000 |
| (3) बाजारभाव(भाडेपटटयाच्या बाबतितपटटाकार आकारणी देतो की पटटेदार ते नमुद करावे) | 34812500 |
| (4) भू-मापन,पोटहिस्सा व घरक्रमांक(असल्यास) | 1) पालिकेचे नाव:नाशिक म.न.पा. इतर वर्णन :, इतर माहिती: इतर माहिती: तुकडी जिल्हा नाशिक पोटतुकडी तालुका नाशिक पैकी,नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे सातपूर या गावचे शिवारातील भोगवटदार वर्ग-1 ची शेतजमीन मिळकत यांसी भुमापन क. 450/1 यांसी स्थानिक नांव 'कोबीचे' यांसी क्षेत्र 1 हे. 15 आर + पोटखराबा 0 हे. 01 आर असे एकूण क्षेत्र 01 हे. 16 आर यांसी आकार रु. 4.81 पैसे,यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र 0 हे. 80 आर(म्हणजेच 8000 चौ.मी.)यांसी सिटी सर्व्हे नं. 6453 ही मिळकत( ( Survey Number : 450/1 ; ) ) |
| (5) क्षेत्रफळ | 1) 0.8000 हेक्टर . आर |
| (6)आकारणी किंवा जुडी देण्यात असेल तेव्हा. | |
| (7) दस्तऐवज करुन देणा-या/लिहून ठेवणा-या पक्षकाराचे नाव किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता. | 1): नाव:-सुमंत अशोक देशखतार च्या तर्फे दस्तऐवज प्रवेशासाठी कु.मु. //ज.मु.म्हणुन शालिनी अशोक देशखतार वय:-57; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: ए-६०१, श्रीजी विले, अल्मेडा रोड, नितिन कंपनीसमोर, पाचपाखडी, ठाणे, नौपाडा आज रोजी नाशिक मुक्कामी. , महाराष्ट्र, THANE. पिन कोड:-400602 पॅन नं:-AHSPD3757A |
| (8)दस्तऐवज करुन घेणा-या पक्षकाराचे व किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता | 1): नाव:-श्री कन्स्ट्रक्शन्स् (भागीदारी संस्था) तर्फे भागीदार 1. निलेश मधुकर जाधव वय:-37; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: फ्लॅट क्र. १०१, स्पेस व्हायब्रर, पाटील लेन नं.४, कॉलेजरोड, नाशिक, महाराष्ट्र, नास्:ईक. पिन कोड:-422005 पॅन नं:-ACHFS0695L<br>2): नाव:-श्री कन्स्ट्रक्शन्स् (भागीदारी संस्था) तर्फे भागीदार अजय भाऊलाल थोरात वय:-40; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: रो-हाऊस क्र. ७, हेरंब अपार्टमेंट, पपया नर्सरी, त्र्यंबकरोड, सातपूर कॉलनी, नाशिक, महाराष्ट्र, नास्:ईक. पिन कोड:-422007 पॅन नं:-ACHFS0695L |
| (9) दस्तऐवज करुन दिल्याचा दिनांक | 18/08/2021 |
| (10)दस्त नोंदणी केल्याचा दिनांक | 20/08/2021 |
| (11)अनुक्रमांक,खंड व पृष्ठ | 8044/2021 |
| (12)बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क | 100 |
| (13)बाजारभावाप्रमाणे नोंदणी शुल्क | 100 |
| (14)शेरा | |

20 INDIA TWENTY RUPEES

| | |
|---|---|
| मुल्यांकनासाठी विचारात घेतलेला तपशील:-: | मुल्यांकनाची आवश्यकता नाही कारण करारनामा अलाहिदा नोंदविला आहे कारणाचा तपशील करारनामा अलाहिदा नोंदविला आहे |
| मुद्रांक शुल्क आकारताना निवडलेला अनुच्छेद :- : | (i) within the limits of any Municipal Corporation or any Cantonment area annexed to it. |

नक्कल अर्ज क्रमांक - १६८७१२९
नक्कल दिनांक -
नक्कल पूर्ण झाल्याचा दिनांक - } २८।०८।२१
नक्कल ~~रजिस्टर पोस्टाने पाठविली~~
समक्ष दिली दि.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-४.

संगणकीय अभिलेखातील प्रत
अस्सल बरहुकुम नक्कल

JOINT SUB-REG... वर्ग-२, नाशिक

दस्त क्र.( ८०४४ /२०२१)
२ — ४४

|  |  |  |
|---|---|---|
| मुल्यांकन विभाग क्र. | : | २२.१७ |
| शेतजमीनीचे क्षेत्र ० हे. ८० आर म्हणजे | : | ८०००-०० चौ.मी. |
| मिळकतीचा प्र.चौ.मी. मुल्यांकन दर रु. | : | ५५७०.०० प्र.चौ.मी. |
| सरकारी मुल्यांकन रुपये | : | ३,४८,१२,५००/- |
| मोबदला रक्कम रु. | : | ४,००,००,०००/- |
| मुद्रांक शुल्क रु. | : | २४,००,०००/- |
| नोंदणी शुल्क रु. | : | ३०,०००/- |
| टिडीएस १% रु. | : | ४,००,०००/- |

(दिनांक २९/०६/२०२१ रोजी नोंदविलेला **साठेखत करारनामा** दस्त क्र. **नसन-३-४८९३/२०२१** अन्वये संपूर्ण मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरलेली असल्याने, प्रस्तुतचा दस्त रु. १००/- चे मुद्रांकावर निष्पादित केला आहे.)

## कायमचे फरोक्त खरेदीखत

कायमचे फरोक्त खरेदीखत आज दिनांक १८ माहे- ऑगस्ट, इसवी सन२०२१ रोज बुधवार ते दिवशी नाशिक मुक्कामी...

**श्री कन्स्ट्रक्शन्स्** (भागीदारी संस्था)
पॅनः ACHFS 0695 L तर्फे भागीदार-

१. **श्री. निलेश मधुकर जाधव,**
वयः ३७ वर्षे, धंदाः शेती व बांधकाम व्यवसायीक,
रा.- फ्लॅट क्र.१०१, स्पेस व्हायझर, पाटील लेन नं.४,
कॉलेजरोड, नाशिक-४२२००५

२. **श्री. अजय भाऊलाल थोरात,**
वयः ४० वर्षे, धंदाः शेती व बांधकाम व्यवसायीक,
रा.- रो-हाऊस क्र.७, हेरंब अपार्टमेंट, पपया नर्सरी,
त्र्यंबकरोड, सातपूर कॉलनी, नाशिक-४२२००७

— लिहून घेणार

**– यांसी –**

नसन–४
दस्त क्र./ ८७४४ /२०२१)
६ — ४४

श्री. सुमंत अशोक देशभ्रतार,
वयः ३८ वर्षे, धंदाः शेती व व्यापार,
पॅनः AOMPD6784Q, आधारः6301 1868 2852,
रा.– ए–६०१, श्रीजी विले, अल्मेडा रोड, नितिन
कंपनीसमोर, पाचपाखडी, ठाणे, नौपाडा–४००६०२
आज रोजी नाशिक मुक्कामी.

लिहून देणार

कारणे कायमचे फरोक्त खरेदीखत लिहून देतो ऐसा जे की –

१) **मिळकतीचे वर्णनः** तुकडी जिल्हा नाशिक पोटतुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे सातपूर** या गावचे शिवारातील भोगवटदार वर्ग–१ ची शेतजमीन मिळकत यांसी **भुमापन क्र. ४५०/१** यांसी स्थानिक नांव **'कोबीचे'** यांसी **क्षेत्र १ हे. १५ आर + पोटखराबा ० हे. ०१** आर असे एकूण क्षेत्र ०१ हे. १६ आर यांसी आकार रु. ४.८१ पैसे, **यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ८० आर (म्हणजेच ८००० चौ.मी.) यांसी आकार रु. ३.३५ पैसे, यांसी सिटी सर्व्हे नं. ६४५३ ही मिळकत प्रस्तुतचे दस्ताचा विषय असून** यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | **गट नं. ४४९** |
| पश्चिमेस | : | **मौजे तिरडशेत गावची शिव** |
| दक्षिणेस | : | **मौजे चुंचाळे शिव व १८.०० मी.रुंद रस्ता** |
| उत्तरेस | : | **गट नं. ४५१ व ४५२** |

येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन मिळकत त्यात असलेले जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी–निक्षेपांसह व मिळकत जाणे–येणेचे, वागवहिवाटीचे पुर्वापारचे रस्त्यांचा/ वहिवाटींचा सामाईकांत वापर करण्याचे हक्कांसह तसेच मिळकतीत असलेली बोअरवेल व विहीर, त्यातील पाणी व सिंचनाचे सुविधेसह शेतजमीन मिळकत दरोबस्त. (यापुढे या दस्तामध्ये काही ठिकाणी संक्षिप्ततेकरीता या दस्ताचा विषय असलेल्या ० हे. ८० आर (८००० चौ.मी.) क्षेत्राचा उल्लेख सदर मिळकत असा केलेला आहे.)

२) **मिळकतीचा इतिहासः**

नसन-४
दस्त क्र.( ८०४४ /२०२१)
४ — ५४

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASIK-IV

अ) मौजे सातपूर, ता.जि. नाशिक येथील गट नं. ४५०/१ यांसी खेत्र १ हे.१५ आर + पो.ख. ० हे. ०१ आर असे एकूण क्षेत्र 1 हे. १६ आर ही मिळकत श्री. माधव लक्ष्मण तिडके यांना वडिलोंपार्जित वारसाहक्काने व फेरफार नोंद क्र. ८००० अन्वये हुकूमनाम्यानुसार वाटपाने मिळालेली मिळकत होती व सदर मिळकतीचे महसूल अधिकार अभिलेखात, ७/१२ उताऱ्यावर भोगवटदार सदरी दाखल होते.

ब) सदर १ हे. १६ मिळकतीपैकी ० हे. ८० आर म्हणजेच २ एकर क्षेत्र त्यांनी त्यांची पत्नी सौ. मिनाबाई माधव तिडके यांचे संमतीने श्री. शालिकराम पारणु देशभ्रतार यांना दिनांक ३०/०१/२००८ रोजीचे कायमचे फरोक्त खरेदीखत दस्त क्र. ९२०/२००८ अन्वये खरेदीखताचा दस्त लिहून देऊन सदर दस्त मे. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग-२ नाशिक-४ यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेला आहे व त्यानुसार सदरील क्षेत्राकरीता श्री. शालिकराम पारणु देशभ्रतार यांचे नांव सदरील ० हे. ८० आर क्षेत्राकरीता फेरफार नोंद नं. ९९५५ अन्वये लागलेले आहे.

क) श्री. शालिकराम पारणु देशभ्रतार यांनी त्यांचे हयातीत दिनांक ०५/०५/२०११ रोजी मृत्यूपत्राचा दस्त लिहून व मे. सह दुय्यम निबंधक सो., नाशिक-१ यांचे कार्यालयात दस्त क्र. नसन-१-०३७९०/२०११ अन्वये नोंदवून ठेवलेला आहे. सदर दस्तात नमूद केलेप्रमाणे त्यांनी त्यांचे अंतिम ईच्छेनुसार वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत त्यांचा नातू (मुलाचा मुलगा) श्री. सुमंत अशोक देशभ्रतार म्हणजेच लिहून देणार यांना एकट्याला दिलेली आहे.

ड) श्री. शालिकराम पारणु देशभ्रतार यांचे दिनांक ०३/१०/२०१६ रोजी निधन झालेले असून, त्यांचे मृत्यूपश्चात लिहून देणार यांनी मे. तलाठी, नाशिक यांचेकडे दिनांक ३०/११/२०१६ रोजी केलेल्या अर्जानुसार वर कलम १ यांत नमूद मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावरील कै. शालिकराम पारणु देशभ्रतार यांचे नांव कमी होऊन नोंदणीकृत मृत्यूपत्राचे दस्ताअन्वये लिहून देणार यांचे नांव फेरफार नोंद नं. १५३३२ अन्वये दिनांक २१/०७/२०१७ रोजी लागलेले आहे.

तेंव्हापासून लिहून घेणार हेच वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीचे एकमेव कायदेशीर मालक असून सदर मिळकत त्यांचे

नसन-४
दस्त क्र.( ६०४४ /२०२१)
५ — ४४

मालकीहक्कात व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत असुन सदर मिळकतीचा उपभोग घेण्याचा, सदर मिळकत कसुन त्यावर पिके घेण्याचा अगर मनमानेल तशी विक्री, व्यवस्था, विल्हेवाट लावण्याचा व त्यापोटी मोबदला स्विकारुन खरेदीदाराचे लाभांत आवश्यक ते साठेखत करारनामा, फरोक्त खरेदीखत अगर अन्य आवश्यक दस्त लिहून व नोंदवून देण्याचा लिहून देणार यांस संपूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार आहे.

३) **दस्तास कारणः** लिहून देणार यांना सदर मिळकत गैरसोईची असल्याने तसेच अन्यत्र सोईची मिळकत खरेदी करणेसाठी आर्थिक रक्कमेची आवश्यकता असल्याने, तसेच सदर मिळकत विक्री केल्याने लिहून देणार यांचे कुटूंबातील घटकांचा विकास होणार असल्याने, लिहून देणार यांनी उपरोक्त मिळकत विक्रीस काढली. याची माहिती लिहून घेणार यांस झाली व लिहून घेणार यांस सदरची मिळकत सोयीची वाटल्याने लिहून घेणार यांनी उपरोक्त मिळकत खरेदी करण्याचे दृष्टीने लिहून देणार यांचेशी संपर्क केला. त्यानुसार उभयतांनी आपसांत विचार-विनिमय करुन उपरोक्त मिळकतीचा व्यवहार पक्का केला. त्यानुसार उभयतांत ठरलेल्या अटी व शर्तीवर तसा **साठेखत करारनामा** चा दस्त लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत लिहून व मे. सह दुय्यम निबंधक सो., नाशिक-३ यांचे कार्यालयात दस्त क्र. **नसन-३-४८९३/२०२१** अन्वये **दिनांक** २९/०६/२०२१ रोजी नोंदवून दिलेला आहे. सदर दस्तात नमूद सर्व अटी व शर्तींची पुर्तता झाल्याने व लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मिळकतीचे मोबदल्याची उर्वरीत संपूर्ण रक्कम अदा केल्याने, प्रस्तुतचा **कायमचे फरोक्त खरेदीखत** चा दस्त लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत आज रोजी लिहून व मे. सह दुय्यम निबंधक सो., नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून दिलेला आहे, तो येणेप्रमाणे.

४) **मिळकतीची किंमतः** उपरोक्त मिळकतीची **एकुण उक्ती किंमत रक्कम रुपये** ४,००,००,०००/- (**अक्षरी रुपये चार कोटी मात्र**) इतकी ठरलेली आहे. उभयतांमध्ये ठरलेली सदरची किंमत आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी अशी असून किंमतीबाबत काहीएक तक्रार नाही. उपरोक्त मिळकतीचा किंमतीचा संपूर्ण भरणा प्रस्तुतच्या दस्तामधील भरणा कलमामध्ये नमुद केलेप्रमाणे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना अदा केलेला आहे.

नसन-४
दस्त क्र. ( ८०४४ /२०२१)
६ — ४४
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASIK-IV

किंमतीबाबत अगर प्राप्त भरण्याबाबत लिहून देणार यांची काहीएक हरकत अगर तक्रार नाही.

५) **मिळकतीची निर्वेधता:** वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची अशी आहे व ती लिहून देणार यांनी अन्य कोठेही गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, जामीन, साठेखत करारनामा, कोर्ट-वाद अशा जडजोखमीमध्ये गुंतविलेली नाही, अगर मिळकतीच्या हद्दीबाबत कब्जाबाबत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही, किंवा मिळकत विक्री करू नये, असा कोणत्याही न्यायालयाचा मनाई हुकूम नाही. तसेच सदर मिळकत कोणत्याही सरकारी अगर निमसरकारी खात्यामार्फत ॲक्वीझिशन अगर रिक्वीझिशन झालेली नाही अगर तसा प्रस्ताव नाही, किंवा तशा आशयाच्या नोटीसा लिहून देणार यांस आजपावेतो मिळालेल्या नाहीत. तसे काही निघाल्यास त्याचे निवारण करण्याची व मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा बोजा असल्यास तो स्वःखर्चाने निरसीत करुन देण्याची जबाबदारी मान्य व कबुल करुन प्रस्तुतचा कायमचे फरोक्त खरेदीखताचा दस्त लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत आज रोजी लिहून व मे. सह दुय्यम निबंधक सो., नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून दिलेला आहे. याउपरही सदर मिळकतीचे टायटलमध्ये दोष निर्माण होईल अशी कोणतीही बाब आढळून आल्यास तिचे निवारण पदरखर्चाने करुन देण्याचे लिहून देणार हे मान्य व कबूल करीत आहेत.

६) **मिळकतीचा कब्जा:** वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीचा खुला, निर्वेध व प्रत्यक्ष कब्जा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना आज रोजी प्रस्तुतचा कायमचे फरोक्त खरेदीखताचा दस्त लिहून व नोंदवून देणेपूर्वी प्रत्यक्ष मिळकतीचे ठिकाणी जाऊन, मोजून-मापून व मिळकतीच्या हद्दीखुणा दाखवून साक्षीदारासमक्ष लिहून घेणार यांस मिळकतीचा कब्जा दिलेला असून, लिहून घेणार यांनीही मिळकतीचा कब्जा स्विकारलेला आहे. मिळकतीवरील लिहून घेणार यांचा कब्जा लिहून देणार यांनी प्रस्तुतचे नोंदणीकृत खरेदीखताचे दस्ताने कायम करुन दिलेला आहे. सबब कब्जाबाबत लिहून घेणार व लिहून देणार यांची काहीएक हरकत अगर तक्रार नाही.

नसन - ४
दस्त क्र. ६०४४ /२०२१
७ - ४४
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-IV

७) **मालकीहक्काने उपभोगः** प्रस्तुतचे दस्ताद्वारे लिहून देणार यांनी वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीत त्यांना प्राप्त असलेले सर्व मालकीहक्क, कब्जाहक्क, वहिवाटहक्क, उपभोगहक्क व सर्व प्रकारचे इजमेंटरी राईटस् कायमस्वरुपी लिहून घेणार यांचे लाभांत हस्तांतरीत करुन दिलेले असून, असा कोणताही हक्क अथवा अधिकार लिहून देणार यांनी स्वतःसाठी अगर वालीवारसांसाठी राखून ठेवलेला नाही. त्यानुसार यापुढे लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचे एकमेव कायदेशीर मालक या हक्क व अधिकारात मनमानेल तसा उपभोग घ्यावयाचा आहे अगर मिळकतीची मन मानेल तशी विक्री, व्यवस्था अगर विल्हेवाट लावावयाची आहे. त्यास लिहून देणार यांची अगर त्यांचेवतीने हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही व अशी हरकत घेण्याचा त्यांस अधिकार देखील राहिलेला नाही.

८) **परवानग्याः** उपरोक्त मिळकत ही भोगवटदार-वर्ग १ ची मिळकत असल्याने तसेच सदर मिळकत विक्री करणेसाठी मे. शासनाची अगर कोणत्याही सक्षम अधिकारी यांचे पुर्व परवानगीची आवश्यकता नाही. तसेच सदर मिळकत विक्री केल्याने लिहून देणार भूमीहिन होत नसुन त्यांचे मालकीची अन्यत्र शेत मिळकत आहे. तसेच लिहून घेणार हे देखील शेतकरी असल्याने वर कलम १ यांत वर्णन केलेली शेतजमीन मिळकत लिहून घेणार यांना खरेदी घेण्यास काहीएक बाध नाही.

९) **जाहीर नोटीस प्रसिध्दीः** उपरोक्त मिळकतीवरील लिहून देणार यांचे मालकी हक्काबाबत व मिळकतीचे निर्वेधपणाबद्दल खात्री करणेकामी लिहून घेणार यांनी त्यांचे वकील श्री. माणिक देवराम बोडके,. नाशिक यांचे मार्फत दिनांक ०६/०६/२०२१ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती. सदर नोटीसीस मुदतीत कोणाचीही हरकत आलेली नाही.

१०) **दस्ताचा खर्चः** प्रस्तुतचे कायमचे फरोक्त खरेदीखताकामी आलेला संपूर्ण खर्च म्हणजे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वकील फी, लिहीणावळ, टायपिंग, झेरॉक्स इत्यादी सर्व अनुषंगीक खर्च हा लिहून घेणार यांनीच केलेला आहे व करावयाचा आहे.

नसन-४
दस्त क्र. ( ८०४४ /२०२१)
८ — ४४

११) **कर व देयकांचा भरणाः** उपरोक्त वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे आजपावेतो आलेले संपूर्ण महसुली कर हे लिहून देणार यांनी त्यांचे पदरखर्चाने भरुन दिलेले असुन यापुढे येणारे सर्व महसुली कर व देयके ही लिहून घेणार यांनी त्यांचे पदरखर्चाने संबंधीत कार्यालयात भरावयाचे व सोसावयाचे आहेत.

१२) **अधिकार अभिलेख हस्तांतरः** लिहून घेणार यांनी प्रस्तुतचे खरेदीखताने वर कलम १ यांत मिळकतींचे महसूल अधिकार अभिलेखात, ७/१२ उताऱ्यावर भोगवटदार सदरी दाखल असलेले लिहून देणार यांचे नांव कमी करुन स्वतःचे नांव स्वखर्चाने दाखल करुन घ्यावयाचे आहे. त्याकामी लिहून देणार यांनी संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून, अर्ज करुन, सह्या, संमत्या, जाब-जबाब व प्रतिज्ञापत्र देऊन विनामोबदला सहकार्य करण्याचे अंगीकारलेले आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकतीचे सिटी सर्व्हे रेकॉर्डला, मिळकत पत्रिकेवर अद्यापपावेतो लिहून देणार यांनी त्यांचे नांव दाखल केलेले नसल्याने, त्याकामी आवश्यक ती पूर्तता करुन लिहून देणार यांनी त्यांचे नांव स्वःखर्चाने लावुन घ्यावयाचे असुन, त्यानंतर त्यांचेऐवजी लिहून घेणार यांचे नांव प्रस्तुतचे दस्ताचे आधारे दाखल करुन द्यावयाचे आहे. त्याकरिता लिहून देणार यांनी संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून, अर्ज करुन, सह्या, संमत्या, जाब-जबाब व प्रतिज्ञापत्र लिहून द्यावयाचे आहे, ही बाब लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे. तसेच लिहून घेणार यांना त्यांची नांवे दाखल करण्यास कोणतीही अडचण निर्माण झाल्यास ती दूर करणेकरीता आवश्यक सहकार्य लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना करावयाचे आहे.

१३) **भोगवट्याकामी कागदपत्रेः** वर कलम १ यांत मिळकतींचे संबंधातील सर्व मुळ दस्तऐवज, कागदपत्रे व परवानग्या लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना त्यांचे भोगवट्याकामी दिलेल्या आहेत.

१४) **बंधनकारकताः** वर कलम १ यांत वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचा व्यवहार व प्रस्तुतचा कायमचे फरोक्त खरेदीखताचा दस्त हा लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर व त्यांचे उभयतांचे पश्चात त्यांचे वालीवारसांवर तसेच उभयतांतर्फे हक्क सांगणाऱ्या इसमांवर बंधनकारक आहे व राहील.

नसन - ४
दस्त क्र. ६०४४ /२०२१
९ - ४४

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2, NASIK-IV

१५) **टि.डी.एस. रक्कमेचा भरणाः** वर कलम १ यांत नमूद मिळकतीचे मोबदल्याची व शासकीय मुल्यांकनाची रक्कम ही रु. ५० लाखांपेक्षा जास्त असल्याने, लिहून घेणार यांनी प्रचलित नियमानुसार मोबदल्याचे रक्कमेवर १.००% टि.डी.एस.ची रक्कम भरुन लिहून देणार यांचे नांवाने शासनास भरणा करुन सदरील चलनांच्या प्रती प्रस्तुतचे कायम फरोक्त खरेदीखताचे दस्तासोबत जोडलेल्या आहेत. सदर टि.डी.एस.ची रक्कम शासनाकडून परत मिळविणेची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांची राहणार असुन, सदरील रकमेशी लिहून घेणार यांचा काहीएक संबंध राहणार नाही, सदरील रक्कम लिहून देणार यांना मिळकतीचे मोबदल्यापोटी मिळालेली आहे असे मानण्यात व समजण्यात येईल.

१६) **जनरल मुखत्यारामार्फत नोंदणीः** लिहून देणार यांना त्यांचे वैयक्तिक कारणांमुळे प्रस्तुतचा दस्त नोंदवून देणे शक्य होणार नसल्याने त्यांनी प्रस्तुतचा दस्त लिहून व त्यावर सह्या अंगठे करुन दिलेले आहेत. त्याचप्रमाणे लिहून देणार यांनी त्यांचेवतीने आवश्यक ती सर्व कामे करण्याचे अधिकार त्यांची आई श्रीमती शालिनी अशोक देशभ्रतार यांना दिनांक २३/०६/२०२१ रोजी म. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग-२, ठाणे-१ यांचे कार्यालयात नोंदविलेला जनरल पॉवर ऑफ ॲटॉर्नीचा दस्त क्र. टनन-१-८३४२/२०२१ अन्वये दिलेले आहे. त्यानुसार प्राप्त हक्क व अधिकारात श्रीमती शालिनी अशोक देशभ्रतार यांनी लिहून देणार यांचेवतीने समक्ष हजर राहून प्रस्तुतचा दस्त लिहून घेणार यांचे लाभांत नोंदवून दिलेला आहे.

१७) **भरणा तपशिलः** उपरोक्त मिळकतीचे मोबदल्यापोटी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खाली नमुद केलेप्रमाणे रक्कम दिलेली आहे व द्यावयाची आहे.

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| ५०,००,०००/- | (अक्षरी रुपये पन्नास लाख मात्र) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना गोदावरी अर्बन को-ऑप बँक लि., शाखाः पंडीत कॉलनी, नाशिक या बँकेचा दिनांक २२/०६/२०२१ रोजीचा चेक क्र. ०००३६७ अन्वये अदा केले. सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |

नसन-४
दस्त क्र. ८०४४ /२०२१
१० — ४४

| | |
|---|---|
| १०,०००/- | (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) लिहून घेणार यांनी त्यांचे बँक खात्यातून लिहून देणार यांचे बँक खात्यात दिनांक २७/०७/२०२१ रोजी आरटीजीएस द्वारे वर्ग केले. सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |
| १,४९,९०,०००/- | (अक्षरी रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख नव्वद हजार मात्र) लिहून घेणार यांनी त्यांचे बँक खात्यातून लिहून देणार यांचे बँक खात्यात दिनांक २९/०७/२०२१ रोजी आरटीजीएस द्वारे वर्ग केले. सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |
| १,७५,००,०००/- | (अक्षरी रुपये एक कोटी पंच्याहत्तर लाख मात्र) लिहून घेणार यांनी त्यांचे बँक खात्यातून लिहून देणार यांचे बँक खात्यात दिनांक ०९/०८/२०२१ रोजी आरटीजीएस द्वारे वर्ग केले. सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |
| २१,००,०००/- | (अक्षरी रुपये एकवीस लाख मात्र) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना गोदावरी अर्बन को-ऑप बँक लि., शाखाः पंडीत कॉलनी, नाशिक या बँकेचा दिनांक १८/०८/२०२१ रोजीचा पे-ऑर्डर क्र. ०२३५९९ अन्वये अदा केले. सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |
| ४,००,०००/- | (अक्षरी रुपये चार लाख मात्र) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचेवतीने टी.डी.एस.ची रक्कम चलनाद्वारे शासनास भरलेली असुन तसे टि.डी.एस. सर्टिफिकेट प्रस्तुतचे दस्तास जोडलेले आहे व सदर रक्कम ही मिळकतीच्या किंमतीच्या मोबदल्यापोटी मिळल्याचे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे. भरणा पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. |

नसन-४

क्र.नं. ६०४४ /२०२१

९१ -- ४८

| | |
|---|---|
| ४,००,००,०००/- | (अक्षरी रुपये चार कोटी मात्र)<br>मिळकतीचे मोबदल्याची एकूण रक्कम |

येणेप्रमाणे उपरोक्त मिळकतीचे मोबदल्याचे संपूर्ण रक्कमेचा भरणा लिहून देणार यांना भरणा तपशिलात नमुद केलेप्रमाणे पावलेला आहे. भरण्याबाबत लिहून देणार यांची काहीएक हरकत अगर तक्रार नाही.

यापुढे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मिळकतीचे मोबदल्यापोटी काहीएक रक्कम देणे बाकी राहिलेले नाही.

येणेप्रमाणे सदरचे कायमचे फरोक्त खरेदीखताचा दस्त आज रोजी, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचेकडून मिळकतीचे मोबदल्यापोटी रक्कम स्विकारुन राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून लिहून, वाचून व समजावून घेऊन, कोणताही प्रकारचा नशापाणी न करता मे. सह दुय्यम निबंधक सो., नाशिक यांचे कार्यालयात समक्ष हजर राहून लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवून दिला असे.

हे कायमचे फरोक्त खरेदीखत.



............................

श्री कन्स्ट्रक्शन्स् तर्फे भागीदार-

१. श्री. निलेश मधुकर जाधव,

-लिहून घेणार-



............................

श्री कन्स्ट्रक्शन्स् तर्फे भागीदार-

२. श्री. अजय भाऊलाल थोरात

-लिहून घेणार-

नसन–४
दस्त क्र.( ८०४४ /२०२१)
९२ -- ४४

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-IV



श्री. सुमंत अशोक देशभ्रतार
–लिहून देणार–

साक्षीदार–

१) नांवः [illegible] सहीः

२) नांवः Narendra Thorat सहीः